व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्राकरिता संगणक यंत्रणा व इतर यंत्रणा खरेदी करण्यास मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उदयोजकता विभाग
शासन निर्णय क्रमांकः रोस्वरो-२०१४/प्र.क्र.२१५/रोस्वरो-१
२ रा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०३ फेब्रुवारी, २०१६

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१ दिनांक १९ मे,२०१४
२) दि.२८ नोव्हेंबर,२०१४ रोजी पार पडलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीचे इतिवृत्त
३) शासन निर्णय क्रमांकः कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र.रोस्वरो-२०१४/प्र.क्र.२१५/रोस्वरो-१ दि.३०.०१.२०१५
४) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे पत्र क्र.रोस्वरो-२०१४/प्र.क्र.२१५/रोस्वरो-१ दि.०६.०२.२०१५
५) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचे पत्र, क्र.रोस्वरो-२०१४/प्र.क्र.२१५/रोस्वरो-१ दि.१२.०३.२०१५
६) कौशल्य विकास,रोजगार व व उद्योजकता संचालनालय यांचे पत्र क्र.रोस्वरो-९/सीजीसीसी खरेदी समिती/५५४१/२०१५ दि.२१ जुलै,२०१५
७) कौशल्य विकास,रोजगार व व उद्योजकता संचालनालय यांचे पत्र क्र.रोस्वरो-९/सीजीसीसी खरेदी /८२२/२०१५ दि.२२ जानेवारी,२०१६
८) शासन ज्ञापन क्रमांकः कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्र.बियुडी-१७१५/प्र.क्र.१३२/रोस्वरो-२ दि.२५ जानेवारी ,२०१६
९) कौशल्य विकास,रोजगार व व उद्योजकता संचालनालय यांचे पत्र क्र.रोस्वरो-९/सीजीसीसी खरेदी /९३७/२०१६ दि.२८ जानेवारी,२०१६
१०) उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४ दि.३० ऑक्टोबर,२०१५

शासन निर्णय-

रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या दि.१९ मे,२०१४ च्या शासन निर्णयान्वये मुंबई-उपनगर, सिंधुदुर्ग, सांगली, औरंगाबाद व नागपूर येथे प्रथम टप्प्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. विभागाच्या दि.२८ नोव्हेंबर,२०१४ रोजी पार पडलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीमध्ये प्रथम टप्प्यातील ५ व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांसाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या संपूर्ण संगणक यंत्रणा व त्या अनुषंगिक इतर यंत्रणेच्या खरेदीस मान्यता देण्यात आली. त्यानुसार संदर्भाधिन शासन निर्णय दि.३०.०१.२०१५ निर्गमित करण्यात आला. तद्नंतर सदर शासन निर्णयात समाविष्ट असलेल्या युपीएस -११ नग, इनर्व्हटर-५,ईपीबीएक्स-५, लॅपटॉप-१० या यंत्रणेच्या खरेदी साठी अल्प कालावधीची निविदा मागविण्यासाठी दि.०६.०२.२०१५ व दि.१२.०३.२०१५ च्या पत्रान्वये कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयास मान्यता देण्यात आली होती. तथापि, असे तरी असले तरी, सदरच्या यंत्रणेच्या खरेदीबाबत डिजीएसॲडडी

वरील दरकराराची वैधता समाप्त झाल्यामुळे व त्यानंतर या खरेदीसंदर्भात दि.३१.०३.२०१५ रोजी पर्यन्त ई-निविदा प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात प्रस्तावित यंत्रणेची खरेदी करता आलेली नाही, असे आयुक्त कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता संचालनालय यांनी उपरोक्त संदर्भ क्र.६ येथील दि.२१.०७.२०१५ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. त्यानुसार आता सन २०१५-२०१६ या चालू आर्थिक वर्षात आयुक्तांनी प्रस्तावित केलेल्या यंत्रणेच्या खरेदीस मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. उपरोक्त परिच्छेदात नमूद बाबी व आयुक्त कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता संचालनालयांच्या दि.२२ जानेवारी,२०१६ च्या पत्रास अनुलक्षून पुढील नमूद पाच व्यवसाय मार्गदर्शन व समपुदेशन केंद्रासाठी खालील यंत्रणा सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षामध्ये खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे :-

अ.क्र.	यंत्रणेचे नाव व तांत्रिक तपशील	मुंबई उपनगर	औरंगाबाद	नागपूर	सांगली	सिंधुदुर्ग	एकूण
१.	**ईपीबीएक्स** No.of Extension 16, No. of Junctions-8, No.of Expandable ports-96,Opertor's Console-01, compatible-ISDN	१	१	१	१	१	५
२	इनव्हर्टर 2500 **VA-36 Back Time 180 minutes**	१	१	१	१	१	५

उपरोक्त यंत्रणेची खरेदी विहीत कार्य पध्दतीचा अवलंब करुन, शासनाच्या प्रचलित नियमातील तरतूदीचे व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करुन करण्यात यावी. सदर यंत्रणेच्या खरेदीवरील खर्च मागणी झेड ए-०१, प्रधान लेखाशिर्ष २२३०-कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन सेवा व ००१-सेवायोजन व प्रशासन,०६ व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांची स्थापना (२२३०६०३८) उपलेखाशीर्ष १३ कार्यालयीन खर्च यामध्ये उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

३. उपरोक्त परिच्छेद क्र.१ येथील प्रस्तावनेत नमूद बाबी तसेच आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालयाच्या दि.२८ जानेवारी,२०१६ च्या पत्रास अनुलक्षून मुंबई उपनगर, सिंधुदुर्ग, सांगली, नागपूर व औरंगाबाद येथील व्यवसाय मार्गदर्शन व समपुदेशन केंद्रासाठी खालील यंत्रणा खरेदी करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहे :-

अ.क्र.	यंत्रणा	दर सर्व करासहीत प्रती नग(रुपये)	नग	एकूण किंमत रुपये	शेरा
१	२	३	४	५	६
१	लॅपटॉप	४६०१६.३५	१०	४,६०,१६३	डीजीएसॲडडीच्या दरकरारानुसार
२	युपीएस	११९६१६.८०	११	१३,१५,७८५	
३	प्रोजेक्टर	३४१६२.५१	१०	३,४१,६२५	
(रुपये. एकवीस लाख सतरा हजार पाचशे त्र्याहत्तर फक्त)				२१,१७,५७३/-	

उक्त खरेदीवर होणारा खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. झेड-ए-१४, प्रधान लेखाशीर्ष,२२३०-कामगार व सेवायोजन,०२-सेवायोजन सेवा व ००१-संचालन व प्रशाासन, (०१)(०८) प्रमोद महाजन कौशल्य आणि उदयोजकता विकास अभियान(२२३०६११८) योजनांतर्गत "१७-संगणक खर्च" या उद्दिष्टातून भागविण्यात यावा.

४. सदर मान्यता वित्त विभागाच्या शासन निर्णय, क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, भाग-२, दि.१७ एप्रिल,२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-दोन, अ.क्र.२७-अ-नियम ७६ नुसार विभागास असलेल्या अधिकारास अनुलक्षून तसेच खालील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे :-

१) उपरोक्त यंत्रणेची खरेदी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन करण्यात यावी.
२) यंत्र सामुग्री प्राप्त झाल्याखेरीज ते निश्चित केलेल्या विनिर्दीष्टाप्रमाणे असल्याची खातरजमा केल्याखेरीज तसेच , यंत्राच्या गुणवत्तेची खात्री पटल्याखेरीज कंपनीस रक्कम प्रदान करण्यात येऊ नये.
३) सदर यंत्रणेची नोंद संबंधित कार्यालयाच्या जडवस्तू संग्रह नोंदवहीत घेण्यात यावी.
४) उपरोक्त यंत्रणेची खरेदी उपलब्ध निधीच्या मर्यादेत करण्यात यावी.
५) उपरोक्त परि.२ मध्ये नमूद यंत्रणेची खरेदी करतांना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.३०.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील विहीत कार्यपध्दती, Manual of office procedure for purchase of stores by the Govt. departments याद्वारे विहीत केलेल्या कार्यपध्दती व नियमांचे आणि इतर सर्व साधारण निर्देशांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यांत यावे.
६) उपरोक्त परि.३ मध्ये नमूद यंत्रेणेची खरेदी उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.३०.१०.२०१५ च्या शासन निर्णयातील प्रकरण क्रमांक ३ मधील परिच्छेद- क्र.३.२.३ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०२०४१६४५४५१७०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samridhi V Angolkar

Digitally signed by Samridhi V Angolkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Samridhi V Angolkar
Date: 2016.02.04 16:45:29 +05'30'

(समृध्दी वि.अनगोळकर)
अवर सचिव

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
२. अधिदान व लेखा अधिकारी ,मुंबई
३. उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
५. आयुक्त , कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकणभवन, नवी मुंबई

६. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. वित्त विभाग, व्यय-५, मंत्रालय,मुंबई
८. नियोजन विभाग, का-१४७१,मंत्रालय, मुंबई
९. महाराष्ट्र कौशल्य विकास संस्था,
१०.संचालक, यशदा, पुणे
११.कक्ष अधिकारी (रोस्वरो-२), कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.निवड नस्ती (रोस्वरो-१).